जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी सेवेतील उत्कृष्ट अभियंत्यांना सन २०१६-१७ या वर्षाकरिता वैयक्तिक व सांघिक पुरस्कार देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: पुरस्कार-२०१७/(प्र.३९/२०१७)/गो.का
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ११.०९.२०१९

वाचा:- शासन निर्णय,जलसंपदा विभाग, क्र.पुरस्कार-२०१५/ (प्र.२१/२०१५) /गोपनीय कार्यासन, दि.१७ जुलै,२०१५

शासन निर्णय

जलसंपदा विभागातील प्रकल्प किंवा योजना इ. राबविताना अभियंत्यांचे तांत्रिक तसेच प्रशासकीय कौशल्य पणाला लागते. अशा प्रकल्पांचे किंवा योजनांचे काम करताना संबंधित अभियंत्यांचे विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येते. अशा अभियंत्यांचा राज्याच्या विकासामधील महत्वाचा वाटा व योगदान विचारात घेऊन, त्यांच्या उत्कृष्ट कामाचे कौतुक व्हावे व प्रोत्साहन मिळावे या हेतूने या विभागातील उत्कृष्ट अभियंत्यांना वैयक्तिक प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यासाठी अभियांत्रिकी सेवेतील कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता या संवर्गातील अधिकाऱ्यांना **वैयक्तिक प्रशस्तीपत्र व सांघिक पुरस्कार** देण्याची योजना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सुरु केली आहे.

२. वरील निर्णयाच्या अनुषंगाने सन २०१६-१७ या वर्षात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी करीता उत्कृष्ट अभियंता पुरस्कारासाठी पुढील तक्त्यात नमूद केलेल्या अभियंत्यांची निवड करण्यात आली आहे.

वैयक्तिक पुरस्कार:--

संवर्ग (गटवारी)	अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व कार्यालय
मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता	१) श्री. दिलीप रामरतन जोशी, अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-१, नाशिक
कार्यकारी अभियंता	१) श्री. जयंत विष्णू खाडे, कार्यकारी अभियंता (यां.), यांत्रिकी मंडळ, कोल्हापूर
उप अभियंता	१) श्रीम. दीपिका भागवत, उप अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय.
कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (क्र. २ व ३ विभागून)	१) श्री. गिरीष पु. अपराजित, सहा. अभियंता श्रेणी-२, कोंकण प्रदेश, मुंबई
	२) श्री. विलास सुकलाल पाटील, शाखा अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग, धुळे.
	३) श्री. गजानन महादेवराव घुगल, सहायक अभियंता श्रेणी-२, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर.

सांघिक पुरस्कार :-

कार्यालय/ पथक (विभागून)	१) राज्य स्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-१, नाशिक व राज्य स्तरीय तांत्रिक सल्लागार समिती -२, पुणे. २) अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम.

३. सदर अभियंत्यांना प्रशस्तीपत्र व गौरव चिन्ह समारंभपुर्वक प्रदान करण्यात येईल. निवड झालेल्या अभियंत्यांच्या सेवापुस्तकात संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी **"प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला"** अशी नोंद घ्यावी व तसे संबंधितांना कळवावे.

४. सांघिक पुरस्कारासाठी रु. १ लक्षचा खर्च "मागणी आय-३, २७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे -८०- सर्वसाधारण (००१) संचालन व प्रशासन-(एक) तांत्रिक व पर्यवेक्षण, (०१)(०१) प्रधान सचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई (अनिवार्य) (२७०१ ११०८) (०५) बक्षिसे " या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा व संबंधित मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता यांनी तो मंजुर तरतुदीतून भागवावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०९१११६३८३२०९२७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Sajanikar

Digitally signed by Prashant Sajanikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=471c7cbe63d119adc5855a3c23ed95de986c1c7bc41d6f6cdd3767b3ebe74c82, serialNumber=217003e42c820ec29c89162937f98929453cc6295b34f71ea285041053a66aa7, cn=Prashant Sajanikar
Date: 2019.09.11 16:50:13 +05'30'

(प्रशांत ज. साजणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२ मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३ मा.मंत्री, जलसंपदा, यांचे खाजगी सचिव
४ मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव
५ मा. विधानसभा/ विधान परिषद विरोधी पक्ष नेता
६ प्रधान सचिव (ज.सं.प्र.व वि.) / सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि)/ सचिव (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
७ सर्व विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य
८ सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग
९ महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१० सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग
११ सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग
१२ सर्व पुरस्कार प्राप्त अभियंते (संबंधित प्रादेशिक कार्यालय प्रमुखांमार्फत)
१३ जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने
१४ गोपनीय कार्यासन संग्रहार्थ.